# आरोग्य विभाग

## १. सीआर/१५६/अमरावती/२०१४.

यातील फिर्यादी हे व्यवसायाने वैद्यकीय अधिकारी असून ते भरारी पथक, प्राथमीक आरोग्य केंद्र, टेंभूं सोडा, ता. चिखलदरा, जि. अमरावती, यांना आलोसे डॉ. रामेश्वर जर्नादन पराडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी, वर्ग -१, जिल्हा परिषद, अमरावती यांनी कारणे दाखवा नोटीस दिली होती. सदर कारवाई न करण्यासाठी आलोसे यांनी रू. १०,०००/- ची मागणी केली. दि. १८.०७.२०१४ रोजी पंचासमक्ष आलोसे यांनी फिर्यादी कडून लाचेची रक्कम स्वीकारतांना पकडण्यात आले.

सदरबाबत गाडगे नगर पोलीस ठाणे, जि. अमरावती येथे गु.र.क्र. ३१०६/२०१४, कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) ला.प्र.का. प्रमाणे गुन्हा नोंद करून आलोसे यांना अटक करण्यात आली आहे.

## २. सीआर/१८८/बुलढाणा/२०१४.

फिर्यादी या टाकरखेड, तालूका चिखली, जिल्हा बुलढाणा येथे रहावयास आहे. त्यांचे पती श्री. पंढरीनाथ गोविंद पैठणे हे झाडावर चढून त्यांचे घरात येणाऱ्या विद्युत लाईनची तार हलवताना खाली पडले व खांदयाचे हाड मोडून जखमी झाले होते. त्यामुळे त्यांना आंतररूग्ण जिल्हा सामान्य रूग्णालय, बुलढाणा येथे भरती केले होते. त्याठिकाणी आरोपी लोकसेवक डॉ.सुभाष मारोतीराव चव्हाण अस्थीव्यंग तज्ञ, सामान्य रूग्णालय, बुलढाणा यांनी फिर्यादी यांना त्यांचे पतीचे खांदयाचे हाडाचे ऑपरेशन करणे आवश्यक असल्याचे सांगून ऑपरेशन करणेसाठी फिर्यादीकडे रुपये ११०००/- लाचेची मागणी केली. दिनांक ०७/०३/१४ रोजी आरोपी डॉ.सुभाष मोतीराव चव्हाण यांनी फिर्यादीकडे तडजोडीअंती रू. ४,०००/- ची लाचेची मागणी करून ती शरद दिनकर तायडे या खाजगी इसमाच्या मार्फतीने स्वीकारली

सदरबाबत बुलडाणा शहर पोलीस ठाणे, गु.र.क्रमांक ३०२२/२०१४, कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३ (२) ला.प्र.का. प्रमाणे गुन्हा नोंद करून नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली.

## ३. सीआर/२५/पुणे/२०१५

तक्रारदार यांची लहान बहीन २ महिन्यांची गरोदर असुन सध्या मुल नको असल्याने तिचा गर्भपात करणे असल्याने तिची तपासणी लोकसेवक डॉ.संजय नथूसाहेब विटकर, वय-३८ वर्षे, वैदयकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, चाकण, ता.खेड, जि.पुणे यांनी केली होती. त्यावेळी लोकसवेक यांनी तक्रारदार यांचेकडे गर्भपात न करणे साठी रु.२,०००/- लाच रकमेची मागणी केली होती. तक्रारदार यांची आरोपी लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे येथे तक्रार नोंदविली. सदर तक्रारीचे अनुषंघाने ग्रामीण रुग्णालय, चाकण, ता.खेड, जि.पुणे याठिकाणी सापळा कारवाईचे आयोजन केले असता लोकसेवक डॉ.संजय नथूसाहेब विटकर, यांनी त्याच्या लोकसेवक पदाच्या नात्याने आवश्यक असलेले काम पार पाडण्यासंबधात कायदेशीर परिश्रमाखेरीज, भ्रष्ट मार्गाने, आपल्या पदाचा गैरवापर करुन स्वतसाठी तक्रारदार यांचेकडे लाच रक्कम रु.२,०००/- मागणी करुन स्वीकारली असता पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे.

सदरबाबत चाकण पो.स्टे., पुणे ग्रामीण, भाग-६, गु.र.नं.३/२०१५, ला. प्र.का.क ७, १३(१)(ड) सह १३(२ अन्वये अटक करण्यात आलेली आहे.